Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

# AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-XII Dec. 2016

Address
- Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
- Tq. Latur, Dis. Latur 413512
- (+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
- aiirjpramod@gmail.com

Website
- www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

# सामाजिक वेदनांचा हृदयस्पर्शी आविष्कार 'निळ्या आभाळाचे गाणे'

प्रा. डॉ. लहू दिगंबर वाघमारे
मराठी विभाग,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
ता. चाकूर जि. लातूर

मराठी साहित्यात आंबेडकरी साहित्यप्रवाह मुख्य साहित्यप्रवाह बनला आहे. त्यातील आंबेडकरी कविता ही अत्यंत समृद्धपणे लिहिली गेली. त्यात संजय घाडगे यांच्या 'निळ्या आभाळाचे गाणे' या कवितासंग्रहाने मोलाची भर घातली आहे. समाजभान असलेल्या या कवीचा हा तिसरा कवितासंग्रह असून यातून मायबाप, स्वातंत्र्यचिंतन, स्त्रियांचे शोषण, स्त्री-भ्रूण हत्या, कवी आणि कविता, जागतिकीकरण या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा वर्तमानकालीन विविध विषयांवर कवीने अत्यंत संवेदनशीलपणे आपल्या अनुभूतीशी व सामाजिक वास्तवाशी प्रामाणिक राहून लेखन केले आहे. असंख्य वेदनांना कवेत घेऊन जगताना त्या वेदनेतून या कवितांचा जन्म झाल्याचे कवीने मनोगतातून नमूद केले आहे. काट्याचे गाव वाट्याला आले, याच वस्तीतील फितूर रस्त्यांना नाकारण्यासाठी आणि वर्षानुवर्षे दबलेल्या, कुचलेल्या माणसांना जागे करण्यासाठी आपण ही कविता लिहित असल्याची कवीने घेतलेली भूमिका कवितेतून उतरली आहे. मानवतेच्या व माणुसकीच्या स्थापनेसाठी उभारलेल्या लढ्याला आपली कविता प्रेरणा देण्याचे अस्त्र आहे, अशी कबुली कवीने दिली आहे. कवितेला लढ्याचे साधन मानण्याची भूमिका घेऊन हे लेखन कवीने केले आहे. लातूर जिल्ह्यातील बोडका या खेड्यातून आलेला हा कवी दुःखभोगी जीवन जगलेला आहे. ग्रामविकास अधिकारी म्हणून कार्य करताना आपल्यातील कवी मात्र त्यांनी सदैव जागा ठेवलेला आहे. विषयाची व्यापकता जरी असली तरी हा कवी रमतो तो आंबेडकरी विचारप्रवाहातच. आंबेडकरी अनुयायांची झालेली दुर्दशा, त्यांच्यावरील होणारे अमानुष अत्याचार, त्याकडे दुर्लक्ष करणारे आंबेडकरी नेते, पुढारी, कार्यकर्ते यांची निष्क्रियता, आजही समाजात आढळणारे मनुप्रणित जातिभेद, बुद्धाचे आदर्श तत्त्वज्ञान आणि त्याची आजच्या जगाला असलेली आवश्यकता या समकालीन विषयांवर कवीने खंबीर भूमिका घेऊन अत्यंत चिंतनशीलतेने लेखन केले आहे. अनुभूतीच्या व प्रतिभेच्या बळावर काव्यलेखन केल्यामुळे हा कवी 'अस्मितादर्श'सह इतर विविध प्रतिष्ठित सहा पुरस्कारांचा मानकरी ठरला आहे. यावरूनच त्यांच्या लेखनाचे मोठेपण लक्षात येते.

युगानुयुगे येथील माणसाच्या मनात रूतून बसलेली जातिभेदाची पाळेमुळे अजूनही उखडून निघाली नाहीत. उलट ती अधिक घट्ट होत आहेत. म्हणूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारख्या जगद्विख्यात महापंडित आणि विद्वान असलेल्या महापुरुषाच्या विद्यापीठ नामांतरास विरोध झाला. त्यात स्वातंत्र्यसेनानी असलेले गोविंदभाई श्रॉफ आणि समाजवादी म्हणून सर्वश्रुत असलेले नरहर कुरूंदकर यांचा पुढाकार असावा ही अत्यंत खेदजनक बाब आहे. एका विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्यास प्रखर विरोध झाला. आंबेडकरी जनतेच्या झोपड्या पेटवून राखरांगोळी करण्यात आली. एवढेच नाही तर अनेक तरूणांना या नामांतरासाठी आत्मदहन करून जीवनयात्रा संपवावी लागली. नामांतराच्या या निमित्ताने जगात महान संस्कृती म्हणविल्या गेलेल्या या देशातील आधुनिक माणसाच्या विकृत व मनुवादी भेदनीतीचे दर्शन कवीने 'फक्त तुझेच नाव होते' या कवितेतून घडविले आहे. ज्या भूमीमध्ये बाबासाहेबांनी मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली आणि तळागाळातील लोकांच्या शिक्षणाची सोय केली, त्याच औरंगाबाद या भूमीतील विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव शोभून दिसते असा दुर्दम्य विश्वास कवीला वाटता. परंतु सलग १४ वर्षे प्रखरतेने संघर्ष करावा लागलेल्या धर्ममार्तंडांनी व

राजकारण्यांनी डावपेच केलेल्या या नामांतर चळवळीचे व त्यासाठी शहीद झालेल्या शूर तरूणांच्या हौतात्म्याचे वर्णन करताना वेदना व हर्षोल्हास अशा दोलायमान अवस्थेत सापडलेला कवी लिहितो-

हासणारे गाव होते जाळणारे राव होते
काळजाला डागणारे धर्मांधाचे डाव होते
बलिदान त्या वीरांचे व्यर्थ ना जाणार आता
विद्यापीठाला शोभणारे फक्त तुझेच नाव होते

भारतातील याच दाहक विषमतेची वेदना कवीने 'मास्तर' या कवितेतून दाहकपणे व्यक्त केली आहे. बालपणी शाळेत शिक्षकाने शिकविलेला या देशातील आदर्शवाद समाजात कवीला कोठेच दिसत नाही. उलट येथे जातीच्या आधारे पदोपदी माणसाची विटंबना केली जाते. एवढच काय बाबासाहेबांच्या जयंतीला तर त्यांच्या प्रतिमेची मिरवणूक निघाली की गावातील गढीची दारे-खिडक्या बंद होतात. येथील मनुवादी समाजव्यवस्थेकडून त्यांच्या प्रतिमेचीही विटंबना केली जाते. याचे 'मास्तर' या कवितेत कवीने केलेले वर्णन मन पिळवटून टाकणारे आहे-

घोषणांचा दुमदुमणारा जल्लोष...
बेधुंद नाचणारी पोरं...
एवढ्यात कुठून तरी फकला जातो खडा
'बा'च्या प्रतिमेवर...
आणि सगळाच गदारोळ....
काठ्या लाठ्या घेऊन...

महापुरुषाच्या मिरवणुकीला येणारे हे युद्धाचे स्वरूप आज अनेक ठिकाणी प्रत्ययास येत आहे. जग प्रगतीकडे वेगाने झेपावत असतानाही विकसनशील असलेल्या आपल्या या देशात देशाचे संविधान निर्माण करणाऱ्या महापुरुषाची एवढी घोर विटबना होत असेल तर आजच्या सर्वसामान्य व अस्पृश्य माणसाला कोणत्या यातना सहन कराव्या लागत असतील याची कल्पनाही करता येत नाही. यावरून या देशातील मनुवादी वृत्तीतून निर्माण झालेली उच्चवर्णीय माणसाच्या मनातील जातिभेदाची भावना नष्ट झाली नाही तर ती अधिक वाढलेली आहे. म्हणूनच अलीकडे खैरलांजी, जवखेडा, सोनाई, नाशिक, उन्ना (गुजरात) येथील माणसांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. आयाबहिणींची अब्रूही लुटण्यात आली. युगानयुगापासून जातीच्या नावाखाली चालत आलेली येथील माणसाची व त्याच्या माणुसकीची ही घोर विटंबना कवीने 'मास्तर' याच कवितेतून व्यक्त केली आहे-

मास्तर... किती बलात्कार...? किती हल्ले...? किती हत्याकांड...
किती दंगली...? जाळपोळ आम्ही पचवले,
त्यांचे आक्रोश, हुंदके टाहो सारखे कानात गुंजत आहेत हो...!

या देशातील जातिभेद, अस्पृश्य माणसावर केलेले निरपराध, क्रूर अत्याचार आणि अस्पृश्य व वंचित माणसाची अपार सोशिकता कवीने येथे चिंतनाच्या पातळीवर शब्दबद्ध केली आहे. या अत्याचारामुळे दुःखी झालेल्या माणसांना व त्यांच्या अश्रूंना कवींनी 'आसवांना कळाया लागले' या गझल काव्यातन् अत्यंत जिवंतपणे मांडले आहे.

दुःख माझे आता कुठे, आसवांना कळाया लागले
वेदनेचे गाव माझे अन् ते का जळाया लागले
पेरले वाटेवरी त्यांनी फास त्यांच्या आजही
हे डाव मनुचे पुन्हा नव्याने ते अवळाया लागले

येथील सनातन्यांनी व मनुवाद्यांनी मनुप्रणित विषमताधिष्ठित समाजव्यवस्थेची केलेली पायाभरणी ही अस्पृश्यांच्या व बहुजनांच्या आमच्या हजारो पिढ्या उद्‌ध्वस्त करणारी आहे. ती अजूनही भक्कम आहे. त्यामुळे आजही उपेक्षित, वंचित, शोषितांवर अमानुष अत्याचार होत आहेत असे कवीला वाटते. या शोषित समाजाचा प्रतिनिधी होऊन लिहिताना कवी अधिकच अंतर्मुख होताना दिसतो. दलित-शोषितांवर एवढे घोर अत्याचार होत असताना आंबेडकरी चळवळीतील नेते, पुढारी आणि कार्यकर्ते मात्र स्वार्थांध, नीतिभ्रष्ट आणि निष्ठूर बनल्यामुळे त्यांचे या अन्याय-अत्याचाराकडे अजिबात लक्ष नाही. ते केवळ खुर्ची, सत्ता, संपत्ती आणि विविध प्रकारचे लाभ मिळविण्यासाठीच पक्ष-संघटना चालवत आहेत. समाजबांधवांवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराशी त्यांचे काहीही सोयरसुतक नाही. म्हणूनच अमानुष अत्याचार पाहूनही ते मूग गिळून बसतात. एखादा मोर्चा काढून शक्तीप्रदर्शन करणे व त्याचा उपयोग सत्ताधीशांवर व प्रशासनावर दबाव आणून स्वतःच्या स्वार्थासाठी करणे हाच या नेत्यांचा व पुढाऱ्यांचा कार्यक्रम सुरू आहे. बाबासाहेबांनीही या देशात सामान्य माणसांच्या न्याय-हक्कांसाठी पक्ष-संघटना उभारल्या, लढे-आंदोलने उभारली आणि येथील सामान्य माणसांना न्याय मिळवून दिला. बाबासाहेब एकटे होते. तरीही येथील जातीवाद्यांना, सनातन्यांना व शासनकर्त्यांना त्यांचा धाक होता. कारण ते निःस्वार्थी, कनवाळू, लढाऊ होते, खंबीर व नेक बाण्याचे होते. म्हणूनच त्यांनी आपल्या समाजबांधवांचे अश्रू पुसले. त्यांना माणुसकीचे सर्व हक्क मिळवून दिले. पण त्यांच्या पश्चात त्यांच्या उत्तराधिकारी नेत्यांनी व पुढाऱ्यांनी त्यांच्या पक्षाचे व संघटनचे अनक तुकडे केले. बाबासाहेबांच्या संकल्पनेतील एकसंघ आणि व्यापक अशा रिपाइंचे आज जवळजवळ ६० तुकड्यांत विभाजन झाले आहे. इतरही विविध नावांनी निघणाऱ्या संघटना व पक्ष तर अनेक आहेत. एकीकडे या पक्ष, संघटनांची संख्या वाढत आहे, तर दुसरीकडे आंबेडकरी अनुयायांवरील अन्याय-अत्याचार वाढत आहेत. हे सूत्र लक्षात घेतले की आजच्या नेते-पुढाऱ्यांचा स्वार्थांधपणा, निष्क्रियता व नीतिभ्रष्टता हेच त्याचे कारण आहे याचा प्रत्यय येतो. बाबासाहेबांच्या चळवळीतोल माणूस त्यांच्यावर प्राण ओतून सहभागी झाला होता. त्यांच्यासाठीच व त्यांच्या चळवळीसाठी प्राणांची आहुती देण्यास सज्ज होता. पण आजचे नेते पुढारी मात्र त्याच बाबासाहेबांना वाटून घेताना दिसतात. त्यांच्या नावाचा वापर केवळ स्वतःला पद, सत्ता आणि संपत्ती मिळविण्यासाठी करतात. नेते, पुढारी व कार्यकर्त्यांचे झालेले हे नैतिक अधःपतन आणि त्यांची स्वार्थी वृत्ती प्रकट करताना 'आता कुणीच कसे बोलत नाही' या कवितेत कवी विषण्णपणे लिहितो-

बाबासाहेब तुमच्या नावासाठी जीव देणारी माणसं
तुमच्या नावावर सुद्धा का एक होत नाहीत...?
बाबासाहेब...?
त्यांनी तुम्हाला वाटून घेतलं सोयी प्रमाणं...!
आणि तुमच्या नावावरती दुकान थाटून बसलेत
गिऱ्हाईकाच्या शोधात...

कवीचे हे चिंतन अत्यंत अर्थपूर्ण व बोलके आहे. बाबासाहेबांच्या नावावर पोट भरणाऱ्या आजच्या स्वाभिमानशून्य, लाचार व स्वार्थी अशा नकली पुढाऱ्यांचे हे वास्तव चित्रण वाचकांनाही अंतर्मुख करून जाते. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा अत्यंत मोलाच मंत्र बाबासाहेबांनी आपल्या अनुयायांना दिला होता. पण त्यांच्या या अमूल्य तत्त्वांची पायमल्ली त्यांच्याच अनुयायांकडून होत असल्यामुळे कवी अत्यंत अस्वस्थ होताना दिसतो.

या परिस्थितीला सावरण्यासाठी बाबासाहेबांसारखा स्वाभिमानी, नि:स्वार्थी आणि निर्भीड बाण्याचा शूरवीर नेता निपजणे गरजेचे आहे अशी अपेक्षा 'माय म्हणायची' या कवितेतील मायीच्या संवादातून कवीने विशद केली आहे. बाबासाहेबांच्या कार्याची व लढ्याची प्रेरणा देताना ही माय आपल्या मुलाला म्हणते-

सरळ ताठ शुर विरांसारखा
छाती काढून चालत रहा
शत्रुलाही धडकी भरावी
नजरेत एवढी जरब असावी
'बाबासाहेबां' वानी....!

आपल्या मुलाने बाबासाहेबांसारखे सरळ, ताठ आणि स्वाभिमानाने चालावे हे या कवितेतील आईच्या संवादातील आशयसूत्र आजच्या लाचार, दिशाहीन व निष्क्रिय नेत्यांना व कार्यकर्त्यांना दिशादर्शक ठरणारे आहे.

जातिभेदान व सर्व प्रकारच्या विषमतेने बरबटलेल्या या जगात वावरताना 'रात्रदिन आम्हा युद्धाचा प्रसंग' असाच प्रत्यय आज येतो आहे. एकीकडे मंदिरे, त्यातील घंटानाद, टाळमृदंगाचे गजर वाजत आहेत, तसेच मस्जिदीतील नमाजाचे कर्णकर्कश स्वर कवीचे अंत:करण आरपार छेदून जात आहेत. तर दुसरीकडे मानवजातीला उद्ध्वस्त करणारे धर्मयुद्ध पेटले आहे. हे विरोधाभासाचे चित्र कवीला दिसून येते. या स्फोटक, विध्वंसक सामाजिक परिस्थितीच्या उत्थानासाठी बुद्ध तत्त्वांचीच नितांत आवश्यकता आहे असे कवीला वाटते. 'शरण जातो' या कवितेत कवी लिहितो-

बुद्धम शरणम् गच्छामी
चा स्वर...
धीर गंभीरपणे माझ्या काळजावर कोरला जातो
आणि तिथंच मी नतमस्तक होतो
बुद्धाला शरण जातो

अखिल विश्वाचे झालेले अमानवीकरण नष्ट करून नव्या समतावादी व मानवतावादी समाजाची पुनर्रचना करण्यासाठी आता जगाला बुद्धाच्या धम्माशिवाय दुसरा पर्याय उरला नाही हे कवीचे भाकित आजच्या निद्रिस्त जगाला खडबडून जागृत करणारे आहे.

समकालीन, सामाजिक, झुंडशाही, भ्रष्टाचार, जागतिकीकरण, स्त्री-भ्रूण हत्या, स्त्रियांचे शोषण, गरिबांचे होणारे शोषण, सत्ताधीशांची दंडुकेशाही व समाजवास्तवाचे चित्रणही कवीच्या 'वेदनेचे असंख्य पदर', 'गर्भातच मारू नका', 'किती दिसांची लढाई', 'माणसासाठी गायचे आहे', 'दे शक्ती मला इथे' यासारख्या प्रातिनिधिक कवितांमधून प्रत्ययास येते. स्वातंत्र्याच्या या देशाला आणि समकालीन विविध समस्यांच्या विळख्यात सापडलेल्या सबंध जगाला वेदनेचा व दु:खाचा प्रत्यय पदोपदी येतो आहे. हे द:ख भोगणाऱ्या समाजाचा प्रतिनिधी असलेला हा कवी विश्वाच्या समतेसाठी 'निळ्या आभाळाचे गाणे' गाताना 'वेदनेचे असंख्य पदर' या कवितेत म्हणतो-

हे वेदनेचे असंख्य पदर स्वत:भोवती
गुंडाळून चालत असतो मी
निळ्या आभाळाचे गाणे गात
हृदयावर कोरून समतेचे शिलालेख

सबंध विश्व ज्या आभाळाच्या छत्राखाली नांदते त्या आभाळाचा निळा रंग बाबासाहेबांनी ध्वजासाठी निवडला होता. हा निळा रंग अखिल विश्वातील, मानवाच्या समतेचे आणि बंधुत्वाचे प्रतिक आहे. बाबासाहेबांची ही निळी क्रांती आकाशव्यापी म्हणजेच विश्वव्यापी आहे. म्हणून सबंध विश्वात समता निर्माण करण्यासाठी हा कवी हे निळे गाणे गाता आहे. या कवितासंग्रहाला कवीने दिलेले 'निळ्या आभाळाचे गाणे' हे शीर्षक येथे अत्यंत समर्पक व अर्थपूर्ण ठरले आहे. सबंध मानवी समाज या निळ्या छत्रछायेखाली सुखाने, समतेने व बंधुत्वाने नांदावा हा बुद्धाचा विचार बाबासाहेबांनी समाजात रूजविण्यासाठी अपार कष्ट केले. म्हणूनच आज या धम्माकडे माणसांचे लोंढेच्या लोंढे निघाले आहेत.

कवी संजय घाडगे यांना प्रेमकवितचेही वावडे नाही. 'तुझेच नाव देईन मी', 'सोडून दिलय मी', 'निळे आभाळ मागते' यासारख्या कवितांमधून कवींची प्रेमभावना प्रकट झाली आहे. परंतु तिथेही प्रेमातील अलंकारिक श्रृंगार, विरहभावना, हुरहूर व्यक्त होत नाही, तर या विषमतेने व समस्याने पोखरलेल्या समाजात वावरताना हेच प्रियकर व प्रेयसी काळवंडून गेले आहेत. ते धकाधकीच्या या जीवनात जातीयतेने, दारिद्र्याने व सर्व प्रकारच्या विषमतेने खंगून गेले आहेत. विषमताधिष्ठित समाजात त्यांचे प्रेमही जात, संपत्ती व सत्तेच्या कडीकुलपात अडकून पडले आहे. या समाजातील ही विषमता उलथून टाकण्यासाठी कवीला या प्रेयसीची साथ हवी आहे. म्हणून तो तिला म्हणतो-

माणूस जातीधर्मात वाटला
आणि सारे शिवार पेटते
तुझे निळाईचे हात
निळे आभाळ मागते

जातिभेदाने पेटलेल्या समाजाची ही आग विझविण्यासाठी कवीला आपल्या प्रेयसीचे हे निळे हात हवे आहेत. तिच्या या हातात प्रियकराला मिठी मारण्याची लालसा नाही तर आभाळ कवेत घेणारे धीरगंभीर सामर्थ्य आहे. म्हणूनच युगानयुगे जाती-धर्माच्या नावाखाली येथील माणसाला छळणाऱ्या या व्यवस्थेचे प्रतिक असलेल्या गावकुसाला कवी आपल्या या प्रेयसीचे नाव देऊ इच्छितो.

'स्वातंत्र्यचिंतन' हाही या कवितासंग्रहाचा महत्त्वाचा विशेष आहे. स्वातंत्र्य मिळून सत्तर वर्षे उलटून गेली. पण येथील सर्वसामान्य माणसाला स्वातंत्र्याचा प्रत्यय येत नाही, उलट दिवसेंदिवस सामान्यांवरील अत्याचार वाढत आहेत. सत्ताधीशांची, राजकारण्यांची व भांडवलदारांची हुकूमशाही, वशिलेबाजी वाढते आहे. त्यामुळे येथे सर्वसामान्यांची पिळवणूक होत आहे. आपण स्वातंत्र्याच्या देशात वावरतो हे तो विसरूनही गेला आहे. स्वातंत्र्यातील सर्वसामान्यांची झालेली ही कोंडी कवीने 'इथे माणसाला', 'अजूनही', 'लोकशाहीची अंत्ययात्रा' यासारख्या कवितेतून गंभीरपणे मांडलो आहे. 'अजूनही' या कवितेत ते लिहितात-

अजूनही माणसांची जळते आहे वस्ती
अजूनही आबलांची अबरू आहे सस्ती।।

ज्या राज्यात माणसांना उद्ध्वस्त करणारे मनसुबे रचले जातात. त्यांचे सरण रचले जाते. स्त्रियांवर उघडपणे बलात्कार केले जातात. त्यांना रस्त्यावर चालणेही भयाचे, संकटाचे व असुरक्षिततेचे वाटावे हे स्वातत्र्य कोणासाठी आले आहे हा कवीचा मूलभूत प्रश्न वाचकांच्या बुद्धीला व भावनांना आव्हान करणारा आहे. सत्ता राबविणारे ती स्वतःसाठी वापरतात. कायद्याची व नियमांची पायमल्ली करतात. त्यामुळे हा देश विकासाच्या दिशेने जाण्याऐवजी विनाशाच्या खोल गर्तेत जाताना कवीला दिसतो आहे. कवीचे हे स्वातंत्र्यचिंतन डोळ्यात जळजळीत अंजन घालणारे आहे.

आपल्या व्यक्तिगत आयुष्यातील अनेक आठवणींना साकार करताना व आपल्या आई-वडिलांचे दारिद्र्य व ते दारिद्र्य झाकण्यासाठी अहोरात्र काबाडकष्ट करणारे त्यांचे खंबीर हात, त्यांची माया, प्रेम व सहनशीलता या काव्यसंग्रहातील 'माझी माय', 'माय म्हणायची', 'मी मायबाप आणि', 'भाकरी उन्हाच्या', 'माय बापावून थोर काय?', 'बाप' यासारख्या कवितांमधून कवीने अत्यंत जिवंतपणे व्यक्त केले आहे. कवी आणि कविता या विषयांवरही कवींच्या अनेक कविता आहेत. 'कवितेचे महत्त्व', 'शब्दांचे तोरण बांधतो मी', 'कवितेचे पारायण करता', 'आवर्त', 'कवीचं जगणं', 'अस्वस्थ कविता', 'कवितेचा ध्यास', 'आन् श्वास घेतो मी', 'भरकटलेले कवी आणि कविता' या विविध कवितांमधून कवितेचे व कवीचे महत्त्व, त्यांचे स्वातंत्र्य व पारतंत्र्य, त्यांची सामाजिक विटंबना व वेडावलेपण याचे विविधांगीपणे चित्रण कवीने केले आहे. वर्तमानकाळात स्त्रियांचे होणारे लैंगिक शोषण, 'पान्हा पाजायचा', 'ती प्लॅटफार्मवर', 'झूला झूलतो' या कवितेतून व्यक्त झाले आहे. त्यातून आजच्या असुरक्षित असलेल्या स्त्रीच्या जगण्याचा भयावह प्रश्न कवीने अत्यत टोकदारपणे मांडला आहे.

पारंपरिक अभंग व गझल या काव्यप्रकारांतूनही कवीने कवितालेखन केले आहे. 'इतुकीशी गोष्ट' या अभंगातून भक्तीऐवजी व 'आसवांना कळाया लागले' या गझलमधूनही पारंपरिक प्रेम व भावकाव्याऐवजी कवीने सामाजिक आशयच व्यक्त केला आहे.

प्रस्तुत कवितासंग्रहातून अनेक विषय मांडले गेले आहेत. साध्या, सोप्या आणि सरळ भाषेतून समाजातील विविध आयामांवर अत्यंत संयत व समतोलपणे प्रकाश टाकला आहे. कवितेला कोठेच साचेबद्धपणा येऊ दिला नाही तर आशयाची व्यापकता कवितासंग्रहाची खोली वाढविणारी आहे. सामाजिक परिवर्तनाचा ध्यास घेऊन कवितालेखन केल्यामुळे या परिवर्तनासाठी ही कविता यशस्वी ठरली आहे. आंबेडकरी चळवळीची स्थित्यंतरे लेखकाने ताकदीने मांडली आहेत. विषयाच्या विविधांगीपणामुळे संजय घाडगे यांची कविता बहुआयामी बनली आहे. काही ठिकाणी पसरटपणा, उपमा, प्रतिमांचा अभाव, आशयातील तोचतोपणा, भाषेतील साधेपणा आणि अलंकारिकतेचा अभाव असे या कवितासंग्रहाचे काही दोष आहेत. पण ही कविता चळवळीला वाहिली असल्यामुळे हे दोष राहणे तसे स्वाभाविक आहे. असे जरी असले तरी सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत ही कविता मोलाचा वारसा व दस्तावेज ठरली आहे हे मात्र खरे आहे.

**संदर्भग्रंथः**

१) संजय घाडगे, 'निळ्या आभाळाचे गाणे', सुविधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २० डिसेंबर २०१४.

२) प्रा. म. सु. पाटील, 'दलित कविता व दलित साहित्याचे सौंदर्यशास्त्र', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २६ मार्च २०१०

३) प्रकाश देशपांडे केजकर, 'आधुनिक मराठी कविता', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, पहिली आवृत्ती, २३ मार्च २०१२.

ISSN 2349-638x
www aiirjournal.com